# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ७९/२०२०**

**विषय :- कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी विद्यापीठ आवारात प्रभावी उपाययोजनेबाबत.**

प्राप्त निर्देशानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, कोरोना विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभुमीवर प्रतिबंधक उपाय योजनेच्या दृष्टीने खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :

१) विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागामधील अध्यापनाचे कामकाज शनिवार दिनांक १४ मार्च, २०२० पासुन पुढील आदेश मिळेपर्यंत बंद राहील. मात्र सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागातील प्रशासकीय व इतर कामकाज नियमित सुरु राहील.

२) ज्या विद्यार्थ्यांना सुट्टी दिलेली आहे ते अनावश्यकरित्या फिरणार नाहीत तसेच वसतिगृहामध्ये, त्याच्या घरामध्ये स्वतःला सुरक्षित ठेवतील. तसेच ते अनावश्यक फिरणार नाहीत, अशा स्पष्ट सुचना देण्यात याव्यात. अन्यथा त्यांना त्यांच्या मूळ गावी जाण्याबाबत सुचना देण्यात याव्यात. जे विद्यार्थी पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात राहतील त्यांच्याही निदर्शनास ही बाब आणावी. कोणी अनावश्यकरित्या शहरात फिरताना आढळल्यास त्यांच्या विरुध्द कार्यवाही होऊ शकेल, याची जाणीव त्यांना द्यावी.

३) **विद्यापीठांच्या व विभागांच्या इतर परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच होतील. वर जे बंधन घालण्यात आलेले आहे ते परीक्षार्थी विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्यासाठी त्यांनी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकिट) सोबत बाळगावे व आवश्यक असल्यास ते दर्शवावे. परीक्षेबाबत शासनाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास तसे कळविण्यात येईल.**

४) विद्यापीठ आवारातील वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांना सदर कालावधीत त्यांच्या मूळ गावी जाण्याचा पर्याय उपलब्ध आहे. या काळात वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांनी संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने शक्यतो वसतिगृहाबाहेर जाऊ नये.

५) प्रतिबंधक उपाय योजनेच्या दृष्टीने विद्यापीठाच्या खालील सुविधा सदर कालावधीत बंद राहतील.

- जयकर ग्रंथालयासहीत इतर सर्व वाचनकक्ष
- कमवा व शिका योजना
- व्यायाम शाळा
- उपवने व उद्याने
- अभ्यागत निवास (विद्यापीठ/सेट/विद्याप्रबोधिनी)
- सर्व क्रिडा सुविधा
- अत्यावश्यक सेवा वगळून इतर वाहनसेवा
- पाळणाघर

६) विद्यापीठात पूर्वपरवानगीशिवाय सर्व अभ्यागतांना सदर कालावधीसाठी प्रवेश वर्जित करण्यात येत आहे. तसेच सकाळी व संध्याकाळी फिरावयास येण्याची सुविधा सदर कालावधीत खंडीत करण्यात येत आहे.

७) विद्यापीठाच्या सर्व प्रवेशव्दारातून केवळ विद्यापीठाचे अधिकारी/कर्मचारी/विद्यार्थी/विद्यार्थीनी/विद्यापीठातील रहिवासी यांना शक्यतोवर विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र पाहूनच प्रवेश दिला जाईल.

८) विद्यापीठ प्रवेशव्दारावरील बायोमॅट्रीक व्यवस्था सदर कालावधीत बंद राहील.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/१३८०
दिनाकं : १३/०३/२०२०

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

आपणास विनंती की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.